PARLE MAHOTSAV

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** MLA, President - Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

PARLE MAHOTSAV

दि. २९.१२.२०१४

कृपया प्रसिद्धीकरिता

# पार्ले महोत्सवातील मल्लखांबात जपानी मुलींनी जिंकली प्रेक्षकांची मने

मुंबई : मुंबईतीलच नव्हे तर राज्यातील स्पर्धक दरवर्षी आतुरतेतेने पार्ले महोत्सवात भाग घेण्याची वाट पाहत असतात त्यासोबतच त्यांची या महोत्सवात जिंकण्यासाठी तयारी चालू असते. यामुळे दरवर्षी सर्वच स्पर्धा अटीतटीच्या होत असतात. या स्पर्धांमधून स्पर्धकांचा कस लागतो. यामुळेच पार्ले महोत्सव दरवर्षी एक नवी उंची गाठत आहे, अशी माहिती पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली.

आठव्या दिवशी मल्लखांब, कबड्डी, हॉलिबॉल, बॉक्स क्रिकेट, फुटबॉल, नेमबाजी आदी क्रीडास्पर्धांमध्ये अटीतटीच्या लढती झाल्या. विशेषतः मल्लखांबपटूंनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. जपानहून भारतात मल्लखांब शिकण्यासाठी आलेल्या कैको सुजी आणि माकी यांनीही पार्ले महोत्सवातील मल्लखांब स्पर्धेत भाग घेऊन सगळ्यांचे लक्ष वेधले. आजवर पुरुषांची मक्तेदारी असलेल्या पुरलेला मल्लखांब स्पर्धेत मुलीही खेळू शकतात हे या दोघींनी आपल्या प्रात्यक्षिकातून दाखवून दिले. मल्लखांब स्पर्धेचा या महोत्सवात दर्जा अव्वल झाला आहे. स्पर्धकही चांगली तयारी करून येतात. त्यामुळे या स्पर्धाही आता राज्यस्तरीय दर्जाच्या होऊ लागल्या आहेत. अटीतटीच्या झालेल्या स्पर्धेत मुलींमध्ये पूजा शर्मा तर मुलांमध्ये गणेश शिंदे ‘पार्ले महोत्सव मल्लखांबपटू’ ठरले. चुरशीच्या झालेल्या कबड्डीच्या अंतिम सामन्यात ब गटात मनोरंजन क्रीडा मंडळ विजेते ठरले.

साठ्ये महाविद्यालयात कला आणि सांस्कृतिक स्पर्धांमध्ये वक्तृत्व, एकपात्री अभिनय, मास्टर शेफ ही पाककृती स्पर्धा, मेहंदी, नृत्य, आणि समूह नृत्य या स्पर्धा झाल्या. सुनिता मसुरकर या पार्ले महोत्सव मास्टर शेफ ठरल्या. पहिल्यांदाच पार्ले महोत्सवात झालेल्या या स्पर्धेत १०० हून अधिकांनी आपल्या पाककला कौशल्य दाखवले. मेहंदी स्पर्धेत अरेबियन मेहंदी प्रकार गटात अंकिता उपाध्ये तर भारतीय मेहंदी मेघा पांचाळ जिंकल्या. २५ डिसेंबरला एलिमिनेशन झालेल्या गायन स्पर्धाही काल संपल्या. या स्पर्धेत विविध आठ गटांत ५२५पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यात चार वर्षाच्या चिमुकलीपासून ८४ वर्षांच्या आजोबांपर्यंतच्या स्पर्धकांचा सहभाग होता. स्त्री आणि पुरुष अशा दुहेरी आवाजात संपूर्ण मैफिल रंगवणारे ख्यातकिर्द पार्श्वगायक साईराम अय्यर यांच्या हस्ते पारितोषिके स्वीकारताना या गायकांच्या चेहऱ्यावरही समाधान दिसत होते.

पार्ले महोत्सवातील अनेक कला-क्रिडाप्रकार विविध वयोगटात घेण्यात येतात. अधिकाधिक वयोगट असल्यामुळे स्पर्धकांची समान वयोगटात विभागणी होते. त्यामुळे आमच्या पाल्यांना ही स्पर्धा सोपी जाते, आणि जिंकण्याची संधीही अधिक मिळते, अशी प्रतिक्रिया पालकांनी व्यक्त केली आहे.

---

हे पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.